**Maratha Vidya Prasarak Samaj's**

**G. M. D. Arts, B. W. Commerce and Science College, Sinnar.**

**Department of Chemistry**

**Report on Guest Lecture organized for M.Sc students**

To upgrade the knowledge of post graduate students our department has organized guest lecture on 07/05/2022 at 11.30 am on "Research opportunities after post-graduation". The resource person for the lecture was Prin. Dr. Dinanath Patil from S. M. B. S. T. Arts, Commerce and Science College Tal. Sangamner, Ahmednagar. The guest was introduced by Miss. Ankita. Rayate and felicitated by Hon Prin. Dr. P. V. Rasal. Total Beneficiaries for the guest lecture were 93 out of which 34 Boys and 59 girls were present. Sir has discussed about different opportunities after pursuing post-graduation degree. Sir mentioned different national institution to persue higher education. The lecture has definitely helped students to find their career after post-graduation.


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR
DEPARTMENT OF CHEMISTRY
"RESEARCH OPPORTUNITIES AFTER POST GRADUATION"
RESOURCE PERSON
CHAIR PERSON

यांनी स्पष्ट केले

# एम एस्सी नंतर संशोधनाच्या अनेक संधी उपलब्ध-डॉ. डी. डी. पाटील

**सिन्नर अपडेट कैलास नवले**




सिन्नर : येथील गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणानंतर संशोधनाच्या संधी या विषयावर कार्यशाळा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी एसएमबीएसटी महाविद्यालय संगमनेर येथील प्राचार्य डॉ. डी. डी. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आर. एम. गवारे उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. डी. डी. पाटील म्हणाले की, विज्ञान विभागात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या संस्थांमध्ये संशोधनाच्या अनेक संधी उपलब्ध असतात. आयआयटी सारख्या दर्जेदार संस्थांमध्येही विद्यार्थी संशोधन करू शकतात. त्यासाठी प्रवेशप्रक्रिया समजावून घेतली पाहिजे. नवीन संशोधनामुळे देशाची अधिकाधिक प्रगती होत जाते, शिवाय या संशोधनाच्या माध्यमातून आणि अनुभवातून आपण आपला स्वतःचा उद्योग, व्यवसाय सुरू करू शकतो. या माध्यमातून आपली वैयक्तिक प्रगती तर होतेच, परंतु त्यामुळे देशाच्या प्रगतीलाही हातभार लागतो असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पी.व्ही. रसाळ सर यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाच्या भरपूर संधी आपल्याला उपलब्ध आहेत. त्यासाठी हे धोरण समजावून घेण्याबरोबरच पदव्युत्तर शिक्षणानंतर आपल्याला कोण-कोणत्या मार्गाने संशोधनाकडे वळता येईल या विषयी विद्यार्थ्यांनी सजग राहणे आवश्यक आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. एम. गवारे व त्यांचे सर्व सहकारी यांनी केले. या कार्यक्रमाला विज्ञान विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.